**<u>ठळक बातम्या</u>**

- संसदेचं  पावसाळी अधिवेशन संस्थगित
- अमेरिकेनं भारतावर लादलेल्या आयात शुल्काला अडचण न समजता  इष्टापत्ती समजावं असं मुख्यमंत्र्यांचं आवाहन
- उपराष्ट्रपतीपदासाठी इंडिया आघाडीचे उमेदवार बी सुदर्शन रेड्डी यांचा  उमेदवारी अर्ज दाखल

**आणि**

- यवतमाळमधे रेल्वे उड्डाण पुलासाठी खोदलेल्या खड्यात बुडून ४ शाळकरी मुलांचा मृत्यू

**<><><><>**

संसदेच्या पावसाळी अधिवेशन आज संस्थगित झालं. २१ जुलैला हे अधिवेशन सुरु झालं होतं. आज सकाळी ११ वाजता लोकसभेचं कामकाज सुरु झाल्यावर, बिहार मतदारयाद्या पुनरीक्षणावर चर्चा करण्याची मागणी विरोधी पक्षांनी केली. मात्र सभापती ओम बिर्ला यांनी प्रश्नोत्तराचा तास पुकारल्यामुळे गोंधळ सुरु झाला. त्यामुळे कामकाज १२ वाजेपर्यंत तहकुब करण्यात आलं. १२ वाजता कामकाज सुुरु झाल्यावरही गोंधळ सुरुच राहिल्यानं अखेर लोकसभेचं कामकाज पुढच्या अधिवेशनापर्यंत संस्थगित करत असल्याचं सभापतींनी जाहीर केलं.

**- - होल्ड बाईट- -**

या अधिवेशनात लोकसभेत एकूण १४ विधेयकं सादर झाली, त्यातली १२ विधेयकं मंजूर करण्यात आली. २८ आणि २९ जुलै रोजी ऑपरेशन सिंदूरवर चर्चा झाली. त्याला प्रधानमंत्र्यांनी उत्तर दिलं. या अधिवेशनात लोकसभेमध्ये केवळ ३७ तास चर्चा झाल्याचं बिर्ला यांनी सांगितलं.

राज्यसभेत उपाध्यक्ष हरिवंश यांनी विरोधी सदस्यांनी दिलेले १८ स्थगन प्रस्ताव फेटाळले. त्यामुळे गोंधळ वाढला आणि राज्यसभेचं कामकाज २ वाजेपर्यंत तहकुब करण्यात आलं.

दुपारी २ वाजता राज्यसभेच्या कामकाजाला सुरुवात झाल्यानंतर ऑनलाईन गेमिंग विधेयक २०२५ राज्यसभेच्या मंजुरीकरता मांडण्यात आलं. यादरम्यान घटनादुुरुस्ती विधेयक २०२५, केंद्रशासीत प्रदेश सुधारणा विधेयक २०२५ आणि जम्मू काश्मीर पुनर्स्थापना विधेयक २०२५ ही तीन विधेयकं संयुक्त समितीकडे विचारार्थ पाठवण्यात आली. त्यानंतर राज्यसभेचं कामकाजही संस्थगित झालं.

<><><><>

अमेरिकेनं भारतावर लादलेल्या आयात शुल्काला अडचण न समजता इष्टापत्ती समजावं असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी केलं आहे. ते आज मुंबईत जागतिक आयात निर्यात धोरणाच्या अनुषंगानं केल्या जाणाऱ्या उपाययोजनांबाबत आयोजित बैठकीत बोलत होते. व्यापार सुलभता धोरण सरकारनं आखलं असून त्याच्या अंमलबजावणीसाठी स्वतंत्र वॉर रूम स्थापन करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

नवीन उद्योगांबरोबरच सध्या अस्तित्वात असलेल्या उद्योगांच्या विकासासाठी शासन सकारात्मक आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले. उद्योगांच्या परवानग्यांसाठी असलेलं सिंगल विंडो पोर्टल अधिक सक्षम करावं, पाच हेक्टर क्षेत्रावरील कृषी प्रक्रिया किंवा कृषीवर आधारित उद्योगांसाठी कुठल्याही परवानगीची आवश्यकता असू नये, यासाठी यंत्रणा कार्यान्वित करावी, अशा सूचनाही त्यांनी केल्या.

<><><><>

इंडिया आघाडीचे उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार, सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश न्यायमूर्ती बी सुदर्शन रेड्डी यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी, राहुल गांधी, शरद पवार, रामगोपाल यादव यांच्यासह इतर नेते उपस्थित होते. उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी रेड्डी यांनी संसद भवन संकुलातील प्रेरणा स्थळावर जाऊन महात्मा गांधींच्या पुतळ्याला अभिवादन केलं.

राष्ट्रीय लोकशाही आघाडीकडून सी पी राधाकृष्णन यांनी याआधी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. अर्जांची छाननी उद्या होणार असून २५ ऑगस्टपर्यंत अर्ज मागे घेता येईल. ९ सप्टेंबरला उपराष्ट्रपती पदासाठी मतदान होईल.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या बिहार आणि पश्चिम बंगालच्या दौऱ्यावर जात आहेत. बिहारमधल्या गया इथं ते विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन करणार आहेत. तसंच गया ते दिल्ली अमृत भारत एक्स्प्रेस गाडीलाही ते हिरवा झेंडा दाखवतील. ६ हजार ८८० कोटींच्या ६६० मेगावॅट बक्सर औष्णिक विद्युत केंद्राचं उद्घाटनही प्रधानमंत्री करतील. तसंच ते १२६० कोटींच्या शहरी विकास प्रकल्पांची पायाभरणीही करणार आहेत.

<><><>

मुंबई शहरातल्या वाढत्या वाहतूक कोंडींच्या समस्येवर उपाययोजना सुचवण्यासाठी आज महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांची भेट घेतली. शहराच्या मूळ समस्येकडे दुर्लक्ष करुन कबुतरे, हत्ती या विषयांकडे अधिक लक्ष देण्याबाबत त्यांनी टीका केली. मुख्यमंत्र्यांनी त्यांना सकारात्मक प्रतिसाद दिला असल्याचं त्यांनी राज ठाकरे यांनी समाज माध्यमावर म्हटलं आहे.

<><><>

छत्रपती शिवाजी महाराजांची पहिली राजधानी राजगड या किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या पुणे जिल्ह्यातील वेल्हे तालुक्याचे नाव राजगड करण्याचा निर्णय महसूल विभागाने घेतला असून या निर्णयाला केंद्र सरकारने मान्यता दिली आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ही माहिती दिली. याबाबतचं राजपत्र लवकरच जारी होईल. वेल्हे तालुक्यातल्या ७० पैकी ५८ ग्रामपंचायती आणि पुणे जिल्हा परिषदेने हा नाव बदलाचा ठराव मंजूर केला होता.

<><><>

यवतमाळ जिल्ह्यातल्या दारव्हा शहरात रेल्वे उड्डाण पुलासाठी खोदलेल्या खड्यात बुडून ४ शाळकरी मुलांचा मृत्यू झाला आहे. रेल्वे स्थानक परिसरात हा निर्माणाधीन पूल असून पिलरसाठी खणलेल्या या मोठ्या खड्ड्यात पाणी साचलं होतं. त्या खड्ड्यात बुडून या मुलांचा मृत्यू झाला.

<><><>

पावसामुळे काल रात्री नाशिकमधे जुन्या नाशिक भागातला तीन मजली जुना वाडा कोसळल्यानं नऊ जण जखमी झाले. जखमींना नजीकच्या रूग्णालयात दाखल केलं आहे.

सध्या पावसामुळे अनेक जुनी घरं आणि वाडे धोकादायक स्थितीत असल्यानं नागरिकांना स्थलांतर करण्याचं आवाहन महानगरपालिकेनं केलं आहे.

<><><><>

बुलडाणा जिल्ह्यातल्या नांदुरा शहरात काल रात्री पोलिसांनी टाकलेल्या छाप्यात एका संशयित आरोपीकडून ४१ तलवारी जप्त करण्यात आल्या. आरोपीला अटक करण्यात आली असून अधिक तपास सुरू असल्याची माहिती जिल्हा पोलीस अधिक्षक निलेश तांबे यांनी दिली.

<><><><>

दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींचं प्रसारण आणि चुकीच्या व्यापार पद्धतींसाठी CCPA, अर्थात केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणानं एका खासगी वाहन सेवा कंपनीला १० लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. केवळ ५ मिनिटांत वाहन सेवेची हमी देणाऱ्या आणि सेवेला विलंब झाला, तर ५० रुपये देण्याचा दावा करणाऱ्या या जाहिरातीची CCPA नं दखल घेतली आहे, आणि ही जाहिरात खोटी असून, ग्राहकांची दिशाभूल करणारी आणि अन्याय्य असल्याचं सांगून ती तात्काळ बंद करण्याचे निर्देश दिले आहेत.

संबंधित व्यासपीठाच्या या जाहिरातीला भुलून ज्या ग्राहकांची फसवणूक झाली आहे, त्यांना कंपनीनं तात्काळ नुकसानभरपाई द्यावी, असे निर्देशही प्राधिकरणानं दिले आहेत. कोणत्याही अटी स्पष्ट न करता आश्वासन, अथवा हमी देणाऱ्या अशा जाहिरातींपासून ग्राहकांनी सावध राहावं, असं आवाहन ग्राहक संरक्षण प्राधिकरणानं केलं आहे.

<><><><>

जम्मू-काश्मीरमध्ये श्रीनगर इथल्या दाल सरोवरात आजपासून येत्या २३ ऑगस्ट पर्यंत तीन दिवसीय खेलो इंडिया जल क्रीडा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. जम्मू-काश्मीरची संस्कृती आणि नैसर्गिक सौंदर्याचा उत्सव म्हणून हा महोत्सव साजरा होत आहे. खेलो इंडिया जल क्रीडा महोत्सव शुभंकर हिमालयीन किंगफिशरपासून प्रेरित आहे.

या महोत्सवात एकूण ३६ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधले ५०० पेक्षा जास्त खेळाडू रोइंग, कॅनोइंग आणि कायाकिंग या क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होतील. यावेळी वॉटर स्कीइंग, ड्रॅगन बोट आणि शिकारा शर्यत यासारखे जल क्रीडा प्रकारही सादर होतील.

भारतीय क्रीडा प्राधिकरण आणि जम्मू-काश्मीर क्रीडा परिषदेनं संयुक्तपणे आयोजित केलेला हा महोत्सव सरकारच्या 'खेलो भारत' धोरणाचा भाग असून, तळागाळातल्या क्रीडा प्रतिभेला प्रोत्साहन देणं, उपजीविकेचं साधन निर्माण करणं आणि स्थानिक पायाभूत सुविधांचं पुनरुज्जीवन करणं, हे या उपक्रमाचं उद्दिष्ट आहे.

**<><><><>**

राज्याच्या विविध भागात मुसळधार पाऊस पडत असून, अनेक ठिकाणी पूरस्थिती निर्माण झाली आहे. **लातूर** जिल्ह्यात उदगीर तालुक्यातल्या बोरगाव बुद्रुक, धडकनाळ आणि टाकळी या पूरग्रस्त गावांना आज जिल्हाधिकाऱ्यांनी भेट दिली. पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे तातडीने पूर्ण करून पात्र लाभार्थ्यांना सानुग्रह अनुदान त्वरित वितरित करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

**सातारा** जिल्ह्यात कोयना धरणासह इतर धरणांच्या पाणलोट क्षेत्रात कमी पाऊस झाल्यामुळे पाण्याचा विसर्ग कमी करण्यात आला आहे. कोयना धरणाचे दरवाजे गुरुवारी सकाळी १३ फुटांवरून ११ फुटापर्यंत खाली आणण्यात आले.

**सांगली** जिल्ह्यात कृष्णा नदी इशारा पातळीवरून वाहत आहे. त्यामुळे नदी काठच्या गावांमध्ये पुराचं पाणी शिरलं आहे. या भागातल्या नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आलं आहे. वारणा धरणातून आज सकाळी पाण्याचा विसर्ग सुरु झाला असून, कोयना धरणातून दुपारी पाण्याचा विसर्ग सुरु होणार आहे. **त्यामुळे धरण व्यवस्थापनानं नदी काठच्या गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.**

**जळगाव** जिल्ह्यातल्या हतनूर धरणातून तापी नदीच्या पात्रात पाण्याचा विसर्ग सुरु आहे. त्यामुळे यंदा पहिल्यांदाच तापी नदीला पूर आला आहे. प्रकाशा बॅरेजचे १२ दरवाजे, तर सारंगखेडा बॅरजचे १० दरवाजे उघडण्यात आले असून, नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

विदर्भाच्या अनेक भागांत गेले काही दिवस मुसळधार पाऊस पडत असून, **चंद्रपूर** जिल्ह्यात वर्धा नदीच्या पाणी पातळीत मोठी वाढ झाली आहे. बल्लारपूर–विसापूर, विसापूर–हडस्ती माना मार्गावर पाणी आल्यामुळे काल हे मार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आले होते. पुरामुळे शेतीचं नुकसान झालं असून, त्याचे पंचनामे सुरु आहेत.

**//<><><><>//**